महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत शासकीय सोयी/सुविधाकरिता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारणे

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक मलोह-२०१८/प्र.क्र.३८९/२०१८/सिं.व्य. (धोरण)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- १५/०५/२०१९

संदर्भ :- १) सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५
२) जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४८०/सिं.व्य. (कामे), मंत्रालय, मुंबई दि.१५ जुलै, २०१५
३) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.प्रसुधा १६१४/३४५/प्र.क्र.७१/ १८ अ, दि.०९ मार्च २०१५

प्रस्तावना -

जनता व प्रशासन यामधील संबंध सुधारण्यासाठी व ते बळकट करण्यासाठी महाराष्ट्र शासनास, प्रशासनामध्ये उत्तरदायित्त्व जबाबदारी व पारदर्शकता आणण्यासाठी कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याची तरतूद करण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश- २०१५ दि.२८/४/२०१५ रोजी राज्यात लागू करण्यात आला आहे.

सदर अध्यादेशातील कलम ३ नुसार संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये जलसंपदा विभागामार्फत नागरीकांना दयावयाच्या १० सेवा अधिसूचित करण्याबाबत सूचना देण्यात आल्यात आल्या असून, लोकसेवांची सूची, नियत कालमर्यादा विहीत नमुना व फी, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी आणि द्वितीय अपिलीय अधिकारी तसेच सेवा मागणीसाठी आवश्यक कागदपत्रे घोषित करण्यात आले आहेत.

संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये ज्या शासकीय सेवांच्या बाबतीत अधिनियम/नियम यामधील तरतूदींनुसार शपथपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती आवश्यक आहेत अशा बाबी खेरीज करुन इतर सेवेसाठी शपथपत्राऐवजी स्वयंघोषणापत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती स्वीकारण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत त्याचे अवलोकन करावे. सदर सूचनांची अंमलबजावणी योग्यरित्या व्हावी म्हणून जलसंपदा विभागांच्या सेवा करीता सविस्तर शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

जलसंपदा विभागाकडून देण्यात आलेल्या खालील १० सेवांच्या बाबतीत स्वयंघोषणापत्र /कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ.क्र.	सेवेची नाव	अर्जासोबत शपथपत्र/ स्वघोषणापत्राची आवश्यकता	अर्जासमवेत कागदपत्रांच्या स्वाक्षांकित प्रती ऐवजी स्वयसाक्षांकित प्रतीची आवश्यकता
१	पाणी वापर संस्थेस देय पाणी हक्क मंजूरी देणे.	फक्त स्वघोषणापत्र	फक्त स्वयंसाक्षाकीत प्रत
२	पाणी वापर संस्थेस पाणीपट्टी थकबाकी दाखला देणे.	फक्त स्वघोषणापत्र प्रत	फक्त स्वयंसाक्षाकीत प्रत
३	बिगर सिंचन पाणीपट्टी थकबाकी दाखला देणे.	फक्त स्वघोषणापत्र प्रत	फक्त स्वयंसाक्षाकीत प्रत
४	पाणीपट्टी देयक तक्रार निवारण करणे.	फक्त स्वघोषणापत्र प्रत	फक्त स्वयंसाक्षाकीत प्रत
५	लाभक्षेत्राचा दाखला देणे.	फक्त शपथपत्र	फक्त स्वयंसाक्षाकीत प्रत
६	ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपंचायत, कटक मंडळे (Cantonment Board) यांना घरगुती पाणी वापर परवाना देणे.	फक्त स्वघोषणापत्र	फक्त स्वयंसाक्षाकीत प्रत
७	महानगरपालिका , खाजगी विकासक, विशेष नगर विकासक, प्रकल्प यांना घरगुती/औद्योगीक पाणी वापर परवाना देणे .	फक्त शपथपत्र	फक्त स्वयंसाक्षाकीत प्रत
८	औद्योगीक प्रयोजनासाठी पाणी वापर परवाना देणे.	फक्त शपथपत्र	फक्त स्वयंसाक्षाकीत प्रत
९	नदी व जलाशय पासून अंतराचा दाखला देणे	फक्त स्वघोषणापत्र	फक्त स्वयंसाक्षाकीत प्रत
१०	उपसा सिंचन परवानगी देणे.	फक्त स्वघोषणापत्र	फक्त स्वयंसाक्षाकीत प्रत

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०५१५१६५१०३४६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.05.15 16:57:19 +05'30'

(अ.अ.कपोले)
उप सचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव

२. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव
३. मा.राज्यनिवडणूक आयोग यांचे कार्यालय
४. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
६. सर्व सन्मानीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य
७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
८. मा.लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय
९. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
१०. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
११. मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी
१२. सर्व कार्यकारी संचालक/मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता
१३. जलसंपदा विभागातील सर्व सहसचिव/उप सचिव/अवर सचिव
१४. कार्यासन सिंव्य (धोरण) निवडनस्ती